महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
Email : eooandm@mahadiscom.in
Website : www.mahadiscom.in

क्र.साप्रवि/मभाक/न.क्र.७७/
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारित इमारत,
तळ मजला, धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.
दुरध्वनी क्रमांक : ०२२- २४०७७४४१
फॅक्स क्रमांक ०२२-२४०२५७६३

## प्रशासकीय परिपत्रक क्र. ३११ दिनांक ०९ / ०९ / २०१०

विषय : प्रशासकीय दैनंदिन कामकाज मराठी भाषेतून करण्याबाबत

संदर्भ : सामान्य प्रशासन विभागाचे शासन परिपत्रक क्र.मभावा-२०१०/प्र.क्र.७५/२०-ब, दिनांक १४ जुलै, २०१०.

---------

प्रशासकीय दैनंदिन कामकाज अपरिहार्यता वगळता एरवी मराठी भाषेतूनच करण्याचे महाराष्ट्र शासनाचे प्रशासकीय धोरण महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीनेही अवलंबिले आहे. त्यानुसार कंपनीने आतापर्यंत विविध प्रशासकीय परिपत्रकान्वये वेळोवेळी मराठी भाषेच्या वापराविषयी सूचना जारी केल्या आहेत.

२. अद्यापही काही कार्यालयांचे कामकाज मराठीतून होत नसल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे. उपरोक्त शासन परिपत्रकान्वये वर्जीत प्रयोजने वगळता सर्व कामकाज मराठीतून करावयाचे आहे याबाबतच्या सूचना शासनाकडून देण्यात आल्या आहेत.

३. या संदर्भात कक्ष अधिकारी उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्र. आयएनई-१०१०/ २१८८/प्र.क्र.३२२/प्रशासन-३, दि. २८/०७/२०१० च्या पत्रासोबत प्राप्त झालेल्या सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या संदर्भिय परिपत्रकाची प्रत सोबत जोडली आहे.

४. सर्व संबंधितांना विनंती करण्यात येते की सामान्य प्रशासन विभागाच्या दि. १४/०७/२०१० च्या उपरोक्त परिपत्रकातील सूचनांचे अवलोकन करून प्रशासकीय कामकाजात मराठीचा १०० % वापर होईल याकडे कटाक्षाने लक्ष देऊन आवश्यक ती उपाय योजना करण्यात यावी.

५. सदर प्रशासकीय परिपत्रक कंपनीच्या www.mahadiscom.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आलेले आहे.

सोबत : वरीलप्रमाणे

(सु.स.पाटील)
*मुख्य महाव्यवस्थापक (क)*

प्रत : महावितरण कंपनीच्या प्रेषण यादीप्रमाणे सर्वांना.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक :- मभावा-२०१०/प्र.क्र.७५/२०-ब,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : १४ जुलै, २०१०

संदर्भ:-१)शा.प. सा. प्र.वि.क्र. मभावा-१०८०/प्र.५४/२०, दि.१८ मे, १९८२

२) शा.नि सा.प्र.वि क्र. मभावा-१०८६/४३४/ प्र.क्र.१६१/८६/वीस ब, दि.१८.जुलै, १९८६

३) शा.नि.क्र.मभावा-१०८७/१०४७/प्र.क्र.१७२/८७/ २०-ब, दि.२१ जुलै, १९८९

४) शा.प. क्र मभावा-१०९२/४७७/ प्र.क्र.४६/९२/२०-ब, दि.१७ नोव्हेंबर, १९९२

५) शा.नि. सा.प्र.वि.क्र. मभावा-१०९४/१३३५/ प्र.क्र.५८/९४/२०-ब, दि.१८.जाने,१९९५

६) न.वि. विभाग पत्र क्रमांक जीइएन-१०९५/८२३/नवि-२७, दि.२४ जानेवारी, १९९६

७)शा.प सा.प्र.वि. क्र. मभावा-२००७/२९ (मुपो)/प्र.क्र.६१/०७/२०-ब, दि.१५.नोव्हे.२००७

## परिपत्रक

महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यानंतर शासनाने मराठीतून राज्यकारभार करण्याचे आपले धोरण जाहीर केले. सदर धोरणानुसार दिनांक २६ जानेवारी, १९६५ पासून मराठी ही राज्याची राजभाषा म्हणून घोषित करण्यात आली आणि महाराष्ट्र राजभाषा अधिनियम, १९६४ मधील तरतुदीनुसार दिनांक १ मे, १९६६ पासून वर्जित प्रयोजने वगळता सर्व कामकाज मराठीतून करणे बंधनकारक करण्यात आले आहे. शासकीय कार्यालयाप्रमाणे शासनाच्या अंगीकृत व्यवसायांनी वर्जित प्रयोजने वगळता सर्व कामकाज मराठीतून करावयाचे आहे व या आदेशाची अंमलबजावणी काटेकोरपणे व्हावी म्हणून या संदर्भात शासनाकडून वेळोवेळी सूचनाही देण्यात आलेल्या आहेत. तथापि, अद्यापही शासनाच्या काही कार्यालये /अंगीकृत व्यवसायांकडून कार्यालयाचे कामकाज १०० टक्के मराठीतून होत नसल्याचे निदर्शनास येते.

शासकीय कामकाजामध्ये मराठीचा वापर करण्याबाबत विधानमंडळ अधिवेशनामध्ये विधान परिषद/सभा यामध्ये प्रश्न उपस्थित होत असतात. सबब, आपल्या कार्यालयातील तसेच आपल्या नियंत्रणाखालील सर्व कार्यालयातील सर्व अधिकारी / कर्मचारी यांचेकडून वर्जित प्रकरणे वगळता १०० टक्के कामकाज मराठीतून होत आहे, उदा-कार्यालयात सादर करण्यात येणाऱ्या

टिप्पण्या, वरिष्ठ अधिका-यांकडून देण्यात येणारे शेरे, विविध प्रकारच्या नोंदवहीतील नोंदी, पत्रव्यवहार, निविदा संदर्भातील कागदपत्रे, आदेश, अधिकारी/ कर्मचा-यांच्या स्वाक्षरी, पदनामाचा उल्लेख, अधिकारी/कर्मचा-यांची नावे उच्चाराप्रमाणे मराठीतून लिहिणे इत्यादी तसेच, कार्यालयातील सर्व नामफलक / सूचना फलक मराठीतून लावण्यात आले आहेत, कार्यालयाकडून निर्गमित करण्यात येणाऱ्या जाहिराती निविदा इत्यादि यांना किमान एका मराठी वर्तमानपत्रातून प्रसिध्दी देण्यांत येते, याबाबत पहाणी करुन मराठीचा १०० टक्के वापर होईल याकडे कटाक्षाने लक्ष देऊन आवश्यक ती उपाययोजना करण्यांत यावी. त्यासाठी आपल्या नियंत्रणाखालील सर्व महामंडळांना / प्राधिकरणांना आवश्यक त्या सूचना देण्यात याव्यात.

वर्जित प्रयोजने वगळता इतर बाबतीत संयुक्तिक कारणे नसताना राजभाषा मराठीचा वापर करण्यास टाळाटाळ करणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांच्या गोपनीय अहवालात नोंद घेण्याबाबत तसेच वारंवार समज देऊनही जे अधिकारी व कर्मचारी राजभाषेचा वापर करण्याच्या नियमांचे पालन करणार नाहीत त्यांच्याविरूध्द शिस्तभंगाची कार्यवाही करण्याच्या सूचना सर्व कार्यालय प्रमुख व विभाग प्रमुख यांना शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग दि.१८ मे, १९८२ अन्वये देण्यात आल्या आहेत. तसेच शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग दि.१८ जुलै , १९८६ अन्वये (१) लेखी ताकीद देणे, (२) गोपनीय अभिलेखात नोंद घेणे, (३) ठपका ठेवणे, (४) एका वर्षाकरिता बढती रोखणे किंवा एका वर्षाकरिता पुढील वेतनवाढ रोखण्याबाबत सर्व कार्यालय /विभाग प्रमुख यांना सूचना देण्यात आल्या आहेत. या सूचनांची कार्यालय प्रमुख व विभाग प्रमुखांनी काटेकोरपणे अंमलबजावणी करावी.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या संकेत स्थळावर (www.maharashtra.gov.in) उपलब्ध करण्यात आलेला असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०१००८१४१३५१५८००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

( डॉ. भालचंद्र भूषण पांडे )
प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,
मा. राज्यपाल यांचे सचिव,
H 14945-1 5
G.R..lwp2C:\Documents and Setting...uch1803\Desktop\V.Jadhav